अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – जगन्नाथ कान्होजी जोशी

माझे वय – ४५वर्षे,

व्यवसाय – पोलीस पाटील

रा. – आचरा पिरावाडी, ता.मालवण, जि. सिंधुदुर्ग

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए.भणगे यांचे मार्फत

०१. दि. १५/१२/२०२३ रोजी पोलीसांनी मला आचरा भगवंतगड रोड येथे घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. सदर ठिकाणी पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता. पंचनामा झाल्यानंतर माझी पंचनाम्यावर सही घेतली होती. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी२/पीडब्ल्यू२** दिली आहे. दि. १५/१२/२०२३ रोजी चिंदर भगवंतगड फाटा दुधडेअरी जवळ बोलविले होते. मला सदर दुधडेअरीचे नाव सांगता येणार नाही. सदर ठिकाणी पोलीसांनी एक वाळूचा डंपर जप्त केला होता. मला त्याचा क्रमांक सांगता येणार नाही. मला आता घरझडती व शोध जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी३/पीडब्लू २** दिली आहे.

सरतपास पूर्ण

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. यु.बी. कुळकर्णी यांचे मार्फत.

०२. मी घटनास्थळ पंचनाम्यावरती सकाळी १०.०० वा. सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनाम्यामध्ये कच्च्या नकाशामध्ये कुठल्या कुठल्या गोष्टी नमूद केलेल्या आहेत हे मला सांगता येणार नाही. मला दुधडेअरीचा ग्रामपंचायत घर क्रमांक सांगता येणार नाही. मला सदर दुधडेअरीच्या मालकाचे नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेल्या ठिकाणी कुठलीही दुध डेअरी अस्तित्वात नाही. हे म्हणणे खरे

आहे की, मला पंचनाम्यातील संपुर्ण मजकूर विचारल्यास मला त्यातील मजकूर सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, छापील पंचम्यावरील मोकळ्या राहिलेल्या ठिकाणावरती काट मारुन पंचाची सही घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावरती मोकळ्या जागेवरती पंचाच्या सहया घेतलेल्या नाहीत. हे मला सांगता येणार नाही की, तिठ्ठयापासून तथाकथित वाळू वाहतूक करणारे वाहन किती अंतरावरती होते. हे म्हणणे खरे आहे की, मला वाळू ओली होती कि सुकी होती हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घ्ज्ञटनास्थळ पंचनाम्यातील कच्च्या नकाशामध्ये ज्या ज्या गोष्टी दर्शविलेल्या आहेत त्या गोष्टी मला सांगता येणार नाही.

०3. मला घरझडती शोध जप्ती पंचनाम्यातील नमूद असलेल्या घराचा क्रमांक सांगता येणार नाही. हे मला सांगता येत नाही की, घर झडती घेतलेल्या घराची लांबी रुंदी व वर्णन, घरझडती शोध व जप्ती पंचनाम्यात नमूद केली होती किंवा नाही. जप्त केलेल्या वाहनाची मालकी व क्रमांक तपासण्यासाठी आरसी बुक पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याला कधीही गेलो नाही, पोलीसांच्या सांगण्यावरुन पंचनाम्यावर मी सहया केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी दोन्हीही पंचनाम्याच्या वेळेस हजर नसतानाही आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १८/११/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण